कार्यशाळा नंतरची वार्तापत्रे

दै. गांवकरी १८-जून २००७

...सकाळ १८-६-२००७

# ...र्थ्यांनी सर्व शाखांना महत्त्व द्यावे

**...यांचे प्रतिपादन**

... ता. १७ : दहावी- बारावीच्या ...ाल्यांनी अभियांत्रिकी पदविका ...ाठी कोणत्या महाविद्यालयात ...खेत प्रवेश घ्यावा, यासाठी ...वपळ सुरू होते.

...र्थ्यांचाच कल माहिती तंत्रज्ञान ...क क्षेत्राकडे आहे; मात्र विशिष्ट ... महाविद्यालयाचा आग्रह न ...शाखांना महत्त्व देणे आवश्यक ... प्रतिपादन पुणे येथील 'एम्स ...ा प्रा. विजय नवले यांनी केले. ...ईखेडकर नाट्यगृहात यशश्री ... क्लासेस (नाशिक) आणि ...पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या 'अभियांत्रिकी करिअर आणि प्रवेशप्रक्रिया' या विषयावर ते बोलत होते.

दर वर्षी अभियांत्रिकी शाखेच्या प्रवेशप्रक्रियेत बहुतांश पालक एका विशिष्ट शाखेला प्राधान्य देतात; मात्र तसे न करता पालकांनी वस्तुस्थितीला धरून एकांगीपणे विचार न करता प्रवेशाचा निर्णय घ्यावा. अभियांत्रिकी प्रवेशाची माहिती आजच्या काळात सर्वत्र उपलब्ध आहे. त्याचा पालकांनी व विद्यार्थ्यांनी उपयोग करावा, असेही ते म्हणाले. या वेळी प्रा. नवले यांच्या 'निवड मार्गदर्शक व अभियांत्रिकी पदविकेनंतर काय?' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. प्रा. जोगळेकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

गांवकरी सोमवार, दिनांक १८ जून २००७ नाशिक आज

# अभियांत्रिकी प्रवेशावेळी वस्तुस्थितीचा विचार करावा : नवले

नाशिक (वार्ताहर) :- अभियांत्रिकीकडे प्रवेश घेताना विद्यार्थी व पालकांनी विशिष्ट शाखा व महाविद्यालयाचा आग्रह न धरता वस्तुस्थिती व तर्कशास्त्राचा वापर करावा, असे प्रतिपादन करिअर तज्ज्ञ प्रा. विजय नवले यांनी केले.

प.सा. नाट्यमंदिर येथे एम पॉवर पुणे व यशश्री इंजिनीअरिंग क्लासेस नाशिक यांच्यावतीने 'अभियांत्रिकी करिअर व प्रवेश प्रक्रिया' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

नवले पुढे म्हणाले, गेल्या काही वर्षापासून अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया सुखावह राहिलेली नाही. नियम बदलत आहेत. कॉलेजची संख्या वाढते आहे. त्यामुळे कोणते महाविद्यालय निवडायचे, कोणाला प्राधान्य द्यायचे हे आपल्या हातात आहे. यासाठी वर्तमानपत्र हे आपल्याला मार्गदर्शक ठरू शकते. प्रवेश प्रक्रियेचा विचार करता अगदी हुशार विद्यार्थ्यांना देखील महाविद्यालय व शाखा निवडताना थोडी तडजोड करावी लागणार आहे. सध्या सॉफ्टवेअर इंजिनीअरिंगकडे मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचा कल दिसत आहे. हे खरे असले तरी अभियांत्रिकीम... प्रत्येक शाखेला महत्त्व आ... विसरून चालणार नाही. त्य... विद्यार्थी व पालकांनी वस्तुस्थि... विचार करून प्रवेशाचा निर्णय घ... असे सांगून नवले यांनी अभियां... करिअर व प्रवेश प्रक्रिया या वि... उपस्थित पालक व विद्यार्थ... विस्तारपूर्वक मार्गदर्शन केले. त... बरोबर उपस्थितांच्या शंक... निरसनही केले. याप्रसंगी प्रा. ... लिखित अभियांत्रिकी शाखा ... मार्गदर्शन व डिप्लोमानंतर पुढे क... या पुस्तकांचे विमोचन करण्यात आले.

याप्रसंगी यशश्री क्लासे... दीपक भोसले, महेश नाटके उप... होते. प्रा. जोगळेकर यांनी सूत्रसंच... व आभार मानले.



सायखेडकर नाट्यगृहात आयोजित व्याख्यानात बोलताना प्रा. विजय नवले. समवेत उपस्थित विद्यार्थी व पालक.